अर्ज उ.प्र.का. क्रं.३१/२०२५
निशाणी यु—६

| | | |
|---|---|---|
| नाव | :— | रमेश रामराव देशमुख |
| वय | :— | ६३ वर्षे |
| व्यवसाय | :— | सेवानिवृत्त |
| राहणार | :— | मेहकर, जि. बुलडाणा |

**सरतपासणी विधिज्ञ श्री. बी. सी. वानखेडे, अर्जदारांकरीता**

**१)** हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्रं. यु—६ खाली माझे शपथपत्र दाखल असून त्यातील लिहीलेला सर्व मजकूर माझ्या माहिती प्रमाणे खरा आहे आणि तो मला माझ्या विधिज्ञांनी समजून सांगितलेला आहे, आणि त्यावर मी सही केलेली आहे. मी या प्रकरणात नि. क्र. यु—२ खाली कागदपत्रांची यादी दाखल केलेली असुन त्याचे विवरण येणेप्रमाणे :

१. निशाणी यु—७ खाली सेवापुस्तकाची प्रत
२. निशाणी यु—८ खाली प्रतिवादींनी निर्गमीत सेवानिवृत्तीचा आदेश
३. निशाणी यु—९ खाली प्रतिवादींनी अर्जदाराला दिलेले उपदान तक्ता
४. निशाणी यु—१० खाली शेवटचे पगार पत्रक
५. निशाणी यु—११ खाली फॉर्म—आय नोटीस

**सरतपासणी पुर्ण.**

**उलटतपासणी प्रतिवादींतर्फे विधिज्ञ श्री एस. एल. राखोंडे.**

**२)** हे म्हणणे खरे आहे की, मी नेमणुक पत्र दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादी महामंडळात ११/०९/१९८९ रोजी कामास लागलो. हे म्हणणे खरे आहे की, माझी उपदान रक्कम कमी मिळाली म्हणुन मी प्रतिवादींकडे लेखी तक्रार केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला देण्यात आलेली उपदान रक्कम पुर्णपणे योग्य व बरोबर असल्यामुळे आता प्रतिवादी महामंडळ मला काहीही देणे लागत नाही. माझेकडे रुजु अहवाल सध्या नाही त्यामुळे तो

**अर्ज उ.प्र.का. क्रं.३१/२०२५**
**निशाणी यु—६**

मी अभिलेखावर दाखल केलेला नाही मला परवानगी दिल्यास मी पुढील तारखेस दाखल करु शकतो.

**उलटतपासणी पुर्ण.**

**सरतपासणी नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत.

स्वा/—
(शा. श. जहागिरदार)
न्यायाधीश,
कामगार न्यायालय, बुलढाणा.

ठिकाण :— बुलढाणा.
दि. :— १०/१२/२०२५